# अमरावती विभागातील तृतीयपंथीयांच्या सामाजिक परिस्थितीचे अध्ययन

पूर्णिमा एन. संधानी[१], संभाजी देसाई[२], *वामन कृ. पोकळे[३]

* पत्रव्यवहाराकरिता लेखक

१,३ – श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय वाशीम, २ –भगिनी मंडळ समाज कार्य महाविद्यालय. चोप्रा ४२५१०७

**गोषवारा:-**

भारतीय घटनेने सर्वांना समानतेच स्वातंत्र्य आहे परंतु तृतीय पंथीयांचा शैक्षणिक दर्जा व वर्तमान स्थिती मागासलेली असल्याने त्यांना स्वतःचा आत्मसन्मान व कायदेविषयक जागरूकता नसते. सामाजिक समस्या मानवी संबंधाशी सलग्नीत असतात व समाजाच्या काही घटकाच्या महत्वपूर्ण आकांक्षा पूर्ततेत अडथळे निर्माण होतात. म्हणून अमरावती विभागातील तृतीयपंथीयांच्या सामाजिक परिस्थितीचे अध्ययन करण्यासाठी ५० तृतीयपंथी उत्तरदात्यांकडून त्यांचे वयोगट, धर्म, मातृभाषा, राहणीमान, आवड, वास्तव्य, पालकांची कुचंबना, घर सोडणे, कुटुंबात स्वीकार, हार्मोन्सची माहिती, जन्मतः नोंदी, निमंत्रण, आशीर्वादाचे/ दुवाचे परिणाम, सामाजिक संस्थांची माहिती, जात पंचायत, व्यवसाय, शिक्षण व्यवस्था, व अडचणी, मार्गदर्शन व सहाय्यक कक्ष, आरोग्य विषयक माहिती या विविध विषयावर एकत्रित केलेल्या माहितीच्या आधारावर निष्कर्ष काढून सुचना व शिफारसी देण्यात आल्या.

**सुचनक शब्द:** तृतीयपंथीय, हिजडा, आशीवार्द, लैंगिकता, समाजमन

**प्रस्तावना:**

हिजडा या संस्कृतीला महाभारतातील शिखंडी, बृहन्नडा, अयप्पा, सुफी व जन्म आणि लग्न समारंभात त्यांचे आशीवार्द हा इतिहास साक्षी आहे. तरी देखील एखाद्या मातेच्या पोटी जर हिजडा जन्माला आला तर त्याची सर्वात जास्त झळ त्याच्या आईला पोहचते. हा गर्भ, हे हिजडा अपत्य माझे नव्हेच असे बाप म्हणतो. ते स्वतःला संपूर्ण पुरुष मानतात, मात्र हिजड्यांचा बाप म्हणून मिरवायला त्यांना लाज वाटते. आईला सर्वच अपत्य सारखे असतात, मग ते हिजडा, गे, द्विलिंगी, अपंग किंवा मंदबुद्धी असो, आई सर्वावर सारखीच माया करते.

हिजडा हा मुळ उर्दू भाषेतील शब्द हिजर या अरेबिक शब्दातून आलेला आहे, व त्याचा अर्थ जमातीतून बाहेर पडलेला असा आहे. हिजडा जन्म घेतो तो पुरुष म्हणूनच, लहान असतांना पुरुष म्हणून वाढतो पण त्याची लैंगिकता वेगळी असते. जसा जसा तो वाढतो तसे तसे त्याचे हावभाव, हालचाली या स्त्रीसारख्या व्हायला लागतात, त्यांना स्वतःलाही जाणवायला लागते. मनाने स्त्री व शरीराने मात्र पुरुष असा प्रकार असतो. त्यातून होणाऱ्या गोंधळात आपण कोण? हे त्याला अनेक दिवसापर्यंत समजताच नाही. पुढे आतून जाणवणाऱ्या बदलामुळे अशी व्यक्ती पुरुषत्वाच्या खुना मिटवायला सुरवात करते व त्यातूनच त्याला हिजडा अशी ओळख मिळते.

भारतीय घटनेने सर्वांना समान स्वातंत्र्य दिले तरी तृतीयपंथीयांचा शैक्षाणिक दर्जा व वर्तमान स्थिती मागासलेली असल्याने त्यांना स्वतःचा आत्मसन्मान व कायदेविषयक जागरूकता नसते. नोकरी, व्यवसाय करणे व स्वतःचे पायावर उभे राहून, समाजाच्या अवहेलना व त्रासांना तोंड देण्याची क्षमता त्यांच्यात विकसित होत नाही. म्हणून अमरावती विभागातील त्यांच्या सामाजिक परिस्थितीचे अध्ययन या विषयावर संशोधन करण्याचे ठरवले.

**उपलब्ध साहित्य पुनरावलोकन :**

शर्मा[१](१९८४) यांच्या अभ्यासांअतर्गत लग्न समारंभात हिजड्यांचा नाच-गाण्याचा कार्यक्रम संपल्यावर त्यांना योग्य बक्षिस मिळाले नाही तर ते साडी/ घागरा वर उचलतात तेव्हा ते प्रेक्षकांना शाप देतात असा समज प्रचलित आहे. शर्मा[१](१९८४) व कारस्टेअरस[२](१९५६) यांनी हिजड्यांची हि कृती म्हणजे प्रेक्षकांकडून पैसे उकळण्याचे प्रभावी साधन असल्याचे उल्लेखित आहे. हिजडा/तृतीयपंथीयांची हि कृती म्हणजे समाजाकडून त्यांना मिळणाऱ्या दुय्यम व तिरस्काराच्या वागणुकीचा परिणाम आहे असे मेहता[३] (१९४५) व जाफरे[४] (१९९७) यांचे मत आहे.

नंदा[५](१९९०) यांचे अभ्यासांतर्गत हिजड्यांचे जीवन अर्धवट पुरुषाप्रमाणे सुरु होते. स्त्रियांचे कपडे घालणे व हाताने विशीष्ट टाळी वाजविणे हे त्यांचे वैशिष्ट्य होय. हिजडे जेव्हा त्यांच्या समूहात राहायला लागतात तेव्हा ते स्वतःला स्त्रीलिंगी नावे लावतात व एकमेकांना स्त्रीवाचक शब्दांनीच बोलतात जसे ताई, काकु, आजी वगैरे.

कोहेन[६](१९९५) यांच्या संशोधनानुसार नपुंसकता असणे हि एक महत्वाची व आवश्यक अट हिजडा समाजात प्रवेश करण्यासाठी आहे अशी सर्व हिजड्यांची मान्यता आहे. व नपुंसकता असल्याने दैवी व शारिरीक शक्ती प्राप्त होते असा हिजडा/तृतीयपंथीयांचा समज आहे. नपुंसकता येण्यासाठी काही पुरुष त्यांचे अविकसित लिंगछेद सुद्धा करतात. लिंगछेद अतिशय क्रूरतेने व भारतीय दंड विधानानुसार

अपराध असल्यामुळे ते असे कार्य अतिशय गोपनीय पद्धतीने व पोलिसापासून खूप दूर अशा ठिकाणी करतात. तृतीयपंथीय लिंग खच्चीकरणाला धार्मिक परंपरा मानून ते लिंग त्यांच्या देवतेला अर्पण करतात.

झोऊ व इतर[७](१९९७) यांनी संशोधनातून प्रथमच जे हिजडे /तृतीयपंथी जन्माने अविकसित पुरुष असतात त्यांच्या मेंदूची रचना स्त्रीत्वाची असते असे मत मांडले. यांचे हे अनुमान "मानसिक लैंगिकतेचा विकास हा बुद्धीचा विकास व लैंगिक हार्मोन्स यांच्यातील परस्पर संवादाचा परिपाक आहे" या गृहीताला समर्थन करतो. तसेच त्यांचा निष्कर्ष मानसिकतेच्या दृष्टीकोनातून जन्मतः चुकीचे लिंग मिळाले अशा या तृतीयपंथीयांच्या विश्वासास सहमत आहे.

तृतीयपंथीय (हिजडा) यांचे अस्तित्व हिंदू धर्मातील पौराणिक कथांमध्ये मानवजातीच्या अस्तित्वापासूनच पाहायला मिळते. अतिशय प्राचीन पौराणिक कथांमध्ये सुद्धा देवाधिदेव महादेव शिवाचा अर्धनारीश्वर म्हणजे अर्ध पुरुष व अर्ध स्त्री असा उल्लेख आढळतो. तसेच महाभारतामध्ये कुरुक्षेत्र येथे अती हुशार व शक्तिशाली अर्जुन सुद्धा स्त्रीवेशामध्ये बृहन्नडा नावाने काम केल्याचे प्रसिद्ध आहे ( हिलतेबेटेल[८] (१९८०), शर्मा[९] (१९८४), नंदा[९] (१९९९).

संदीप बक्षी[१०] (२००४) यांनी तृतीयपंथी/हिजड्यांच्या चालीरीती व त्यांच्या धार्मिक आस्थेविषयी अभ्यास करण्यासाठी १९९२-१९९८ या काळात नवी दिल्ली येथे बऱ्याच लग्न समारंभात हिजड्यांच्या भेटी घेतल्या. मोरान व शार्प[११] (२००४) यांच्या अभ्यासानुसार ६०% तृतीयपंथीयांना प्राणघातक हल्ल्यांना सामोरे जावे लागते. तर फित्झपत्रीक व इतर[१२] (२००५) यांच्या मते ३२% तृतीयपंथीय विद्यार्थी, निराशावादी व आत्महत्त्या करण्यास प्रवृत्त होतात.

सेन[१३] (२००५) यांच्या अभ्यासानुसार तृतीयपंथी/हिजडे हा शब्द अशा लोकांसाठी वापरतात जे समाजाच्या स्त्री व पुरुष या लैंगिक मर्यादेच्या पलीकडे असतात. जे लोक हावभाव व राहणीमानाने त्यांच्या शारीरिक लिंगापेक्षा भिन्न असतात असे व्यक्ती हिजडा या नावाने ओळखले जातात. तृतीयपंथी पैकी बऱ्याच लोकांना त्यांच्या लिंगपरिवर्तनाची जाणीव बालपणातच होते. या संशोधनानुसार तृतीयपंथीयांच्या लिंगपरिवर्तनाच्या काळातील वागणूक जसे हावभाव, बोलणे-चालणे, कपडे परिधान करणे, खेळणे यातील फरक साधारणपणे वयाच्या ५ व्या वर्षापासून जाणवते.

भारतीय घटनेच्या कलम १९ नुसार (योगकर्ता[१४]२००८) धर्म, जात व लिंग यावरुन कोणताही भेदभाव करण्यास सक्त मनाई आहे तरी पण भारतामध्ये लैंगिक अल्पसंख्याक जसे तृतीयपंथी/हिजड्यांच्या मानवीय मुलभूत हक्काबद्दल भेदभाव केल्या जातो. त्यांचा अभ्यास व ओळख करून घेण्याची जिज्ञासा या विषयाला दिवसेंदिवस महत्व येत आहे. सेठ पार्डो[१५] (२००८) यांनी तृतीयपंथी/हिजडे यांच्यावर होत असलेल्या संशोधनावर अभ्यास करून स्त्री-पुरुष यांच्या पलीकडे त्यांची लैंगिकता समजण्यासाठी एक रूपरेषा तयार केली. समाजामध्ये जन्मतः स्त्री-पुरुष असे वर्गीकरण करण्याबाबत लिंग हा एक महत्वाचा गुणधर्म आहे. त्यांनी[१५] असे नमूद केले की जन्माचे वेळेस बाहय लिंगावरून आपली ओळख स्त्री/पुरुष होते व तसे नाव ठेवल्या जाते. तेव्हापासून आपण आपल्या लिंगानुसार आपली वागणूक, बोलणे, कपडे घालणे इत्यादी समाजातील अनुभव व रीतीरिवाजानुसार स्त्री/पुरुष या प्रमाणे प्रगती करत असतो. परंतु कधी कधी एखाद बाळ विरूद्ध लिंग असल्याची वागणूक करतो व तसे जन्माला यायला पाहिजे होते असा विचार करतो. असे मुल आपल्या बदलत्या लैंगिकतेचे प्रदर्शन विरूद्ध क्रिया व तसे कपडे घालून व्यक्त करतो.

इतिहासामध्ये हिजडा/तृतीयपंथी यांचे अस्तित्व पुरातन काळापासून (ख्रिस्त पूर्व ९००) आढळते. पुरातन काळात राजवाड्यामध्ये राण्या व महिलांच्या निवास स्थानी रक्षणार्थ व सेवेसाठी तृतीयपंथी/हिजडे यांची मागणी चांगलीच प्रचलित होती. हि परंपरा चीन देशात सुरु झाली. चीन देशात राजेशाही व राजवंश संपुष्टात आल्यावर जवळपास ७०००० हिजड्यांचे वास्तव्य राजवाड्यात होते (प्रीती शर्मा[१६]२०१२). महाभारतातील कुरुक्षेत्र येथील महायुद्धात पितामहः भिष्माला हरविण्यासाठी पांडवांनी शिखंडी या हिजड्याची मदत घेतली होती अशी इतिहासात नोंद आहे.

रजिया सुलताना[१७] (२०१२) यांनी त्याच्या पुस्तकात समाजाने नाकारलेल्या समाजाच्या परिघाबाहेर असलेल्या तृतीय पंथीय समुदायाविषयी आपले निर्भीड व आधुनिक विचार मांडले आहेत. या समुदायाविषयी आधारित चित्रपट, फायर, जोगवा, शबनम मौसी यामध्ये भावना व मानसिकतेचे अनेक पैलू दाखविले असले तरी समाज मनात उद्वेग उत्पन्न होऊन वादंग निर्माण झालेला आहे याचा अर्थ भारतीय समाज या समुहाला आज सहजासहजी स्वीकारत नसेल तरीही भविष्यात आपल्याला त्यांना नाकारता येणार नाही. अर्थात त्यांनी[१७] भविष्यात समाजव्यवस्थेमध्ये काय काय परिणाम व बदल होऊ शकतात याचा समीक्षात्मक मागोवा घेतलेला आहे.

अनिथा चेटीअर[१८](२०१५) यांनी त्यांच्या पी.एच.डी. शोध प्रबंधात हिजड्यांचे सामाजिक/आर्थिक स्थान व त्यांच्या आरोग्यविषयक समस्या व पोलिसांचा मानसिक/शारिरीक छळ याबाबत मुंबई शहरातील हिजड्यांचा सखोल अभ्यास केला आहे. त्यांनी मुंबई व ठाणे जिल्ह्यातील ६३ हिजड्यांची माहिती गोळा केली. त्यांच्यापैकी अर्ध्यापेक्षा जास्त हिजडे मध्यम वर्गीय तर ४०% निम्न वर्गीय आढळले. जास्तीतजास्त हिजड्यांना आरोग्याच्या समस्या, छळ, बेकायदेशीर दंड, लैंगिक त्रास, जुलूम, मानवाधिकार हिरावून घेणे अशा समस्यांना सामोरे जावे लागते असे त्यांच्या[१८] संशोधनातून आढळले. तसेच हिजड्यांना मुख्यत्वे रहदारी व रेल्वे पोलिसांचा त्रास होत असल्याची बाब त्यांनी[१८] लक्षात आणुन दिली.

सिबशंकर माल[१९](२०१५) यांच्या संशोधनाचा मुख्य हेतू म्हणजे आरोग्य सेवा व समाजाकडून आर्थिक आधारावर होणारा छळ यामुळे हिजड्यांच्या राहणीमानावर व सामाजिक स्तरावर होणारे परिणाम हा होय. त्यांनी[१९] पश्चिम बंगालमधील खरगपूर शहरातील ५१

हिजड्यांकडून माहिती संकलन केली. या अभ्यासानुसार जास्तीत जास्त हिजड्यांना आरोग्य सेवेत कमतरता, छळ, बेकायदेशीर दंड, मानसिक अत्याचार व मानवी हक्कापासून वंचित ठेवणे हे सर्व त्रास सहन करावे लागतात.

**अध्ययनाचे महत्व, निवडलेला विषय व संभाव्य संशोधन प्रश्न :–**

सामाजिक कार्यकर्ते व संशोधक यांच्याकडून सामाजिक समस्यावर संशोधन करून त्या ज्ञानाच्या आधारे सामाजिक प्रश्न हाताळण्याचा व त्यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न अविरतपणे चालू असतो. अशा प्रकारच्या सामाजिक संशोधनाची, नियोजन बद्ध व प्रभावी सामाजिक विकासासाठी देशाला नितांत आवश्यकता आहे.

"अमरावती विभागातील तृतीयपंथीयांच्या सामाजिक परिस्थितीचे अध्ययन" या विषयाअंतर्गत तृतीयपंथियांची सांखिकीय माहिती गोळा करून त्यांच्याबद्दल असणारे गैरसमज दूर करून समाजात प्रतिष्ठा पूर्वक त्यांचे अस्तित्व जपून समाजाचे मुख्य प्रवाहात आणण्यासाठी उपयोग होईल. प्रस्तुत संशोधन, शासन, स्वयंसेवी संस्था, निमशासकीय संस्था, तृतीयपंथियांची संघटना व इतर संबंधीत संस्थांना योजना आखतांना उपयुक्त ठरणारे आहे.

उपलब्ध साहित्य परीक्षण, वास्तविक ज्ञान व परिस्थितीचे अवलोकन यातून खालील समस्यावर संशोधन केले.

1) उत्तरदात्याची वर्तमान सामाजिक, आरोग्य व शैक्षणिक परिस्थिती
2) तृतीयपंथीयांचा त्यांच्या कुटुंबात स्वीकार
3) समाजामध्ये त्यांचा सहभाग
4) समाजात वावरतांना त्यांना कोणत्या प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागते?
5) शासकीय सोय, सुविधांचा त्यांना फायदा
6) समाजाचा त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन
7) मुख्य प्रवाहात त्यांच्या विकासातील नेमके अडथळे कोणते?

तथ्य संकलन :–

प्रस्तुत अध्ययनासाठी प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही तथ्य संकलनाच्या पद्धतीचा उपयोग केला आहे. अमरावती विभागातील तृतीयपंथीय लोकांमध्ये शिक्षणाचे प्रमाण खूप कमी आहे. समाजाच्या दुषित दृष्टिकोनामुळे त्यांची समाजातील इतर लोकांचे तुलनेत व्यक्तिगत विकास खुंटलेला आहे. म्हणून या कार्यात प्राथमिक पद्धतीतील मुलाखत अनुसूची या तंत्राचा तथ्य संकलनाकरिता उपयोग केला आहे. प्रस्तुत विषयाशी संबंधीत तथ्य संकलनासाठी दुय्यम स्त्रोतांचा सुद्धा वापर करण्यात आला. त्यात प्रस्तुत विषयाशी संबंधीत संशोधने, नियतकालिके, संकेतस्थळे, ग्रंथालय इत्यादीचा उपयोग केला आहे. शासकीय विभाग, स्वयंसेवी संस्था, तृतीयपंथीय लोकांच्या कल्याणा करीता कार्य करणाऱ्या संस्थेकडून त्यांचे दस्तावेज, कागदपत्रे शासकीय, अशासकीय नोंदणी इ. कडून माहिती प्राप्त केल्या गेली.

उत्तरदात्यांची वैयक्तिक व कौटुंबिक परीस्थिती कशी आहे हे उत्तरदात्यांचा वयोगट, घराचा प्रकार, मातृभाषा, आवडी–निवडी, राहणीमानाचा दर्जा, इत्यादी बाबत संबंधीत घटकामध्ये माहिती संकलित करण्यात आली.

**वयोगट :–** भिन्न वयातील व्यक्तींचे एका समस्येवर मत वेगवेगळे असू शकते. त्याचबरोबर वयानुसार व्यक्तीमध्ये प्रगल्भता निर्माण होवून विचार करण्याची पद्धतीही बदलते त्यासाठी उत्तरदाता हा कोणत्या वयाचा आहे यासाठी वयोगटाचे अध्ययन करण्यात आले. या अभ्यासावरून असे स्पष्ट होते कि जास्तीत जास्त ३१ ते ४० वयोगटातील ३० म्हणजे ६० % तृतीयपंथी जास्त आहे. तर सर्वात कमी ५१ पेक्षा जास्त वयोगटातील २ म्हणजे ४ % तृतीयपंथी आहेत. उपरोक्त अभ्यासाअंती असा निष्कर्ष निघतो की अकोला येथील तृतीयपंथीयांचे वयोगट ३१ ते ४० या मधील उत्तरदात्यांची संख्या सर्वाधीक जास्त आहे.

**धर्म :–** संबंधीत विषयाचा अभ्यास करतांना धर्माबाबत असे निदर्शनात आले की, तृतीयपंथी देवी देवतांना मानतात आणि कुठल्याही धर्माबाबत भेदभाव करत नाही. अध्ययनाकरीता घेतलेले सर्वच उत्तरदाते बोचारादेवी आणि अजमेर येथील सलीम ख्रिस्ती दर्ग्याला मानतात. भारतीय समाज रचनेमध्ये धार्मिक विविधता आहे तरीही तृतीयपंथी समुदायामध्ये सर्व धर्म सम भाव दिसून येतो.

**मातृभाषा :–** लहान बालक सर्वप्रथम मातृभाषेतून बोलणे शिकतो. या भाषेच्या माध्यमातून त्याला संस्कार, सामाजीकरण या गोष्टी शिकावयास मिळतात. त्याचबरोबर तो वयस्क झाल्यानंतर मातृभाषेच्या परंपरेनुसार त्याचे विचारही बदलत जातात. या अभ्यासाअंतर्गत घेतलेल्या एकूण ५० उत्तरदात्यापैकी मराठी भाषा बोलणारे ४२ म्हणजे ८४% आहे. म्हणजेच मराठी भाषा बोलणाऱ्यांची संख्या जास्तीत जास्त आहे. हिंदी भाषा बोलणाऱ्यांची संख्या ५ म्हणजे १०% आहे तर उर्दू भाषा बोलणाऱ्यांची संख्या ३ म्हणजे ६% आहे.

**राहणीमान :–** भारतीय समाजव्यवस्थेमध्ये तृतीयपंथीय लोकांचा सहभाग, देवाणघेवाण तुरळक आहे. मुख्य प्रवाहापासून लांब गावाबाहेर समुदाय किवा तांडे करून राहणे जास्त पसंत करतात. समाजातील भेदात्मक दृष्टीकोन, उपेक्षा, चेष्टा व आर्थिक स्थिती साधारण असल्याने व उदरनिर्वाहाचे मर्यादीत साधन असल्याने तृतीयपंथीयांचा राहणीमानाचा दर्जा साधारण आहे.

**आवड :–** संशोधकाने अभ्यासाअंतर्गत घेतलेल्या एकूण ५० उत्तरदात्यापैकी नृत्याची आवड असणारे उत्तरदाते १ म्हणजे २% आहे, तर गायनाची आवड असणारे उत्तरदाते २ म्हणजे ४% आहे आणि फिरण्याची आवड असणारे १२ म्हणजे २४% आहे तर इतर आवड असणारे सर्वाधिक जास्त उत्तरदाते ३५ म्हणजे ७०% आहे. सादर निरीक्षणावरून असे दिसते की जास्तीत जास्त इतर म्हणजे शृंगार करणे, टिव्ही बघणे, शारिरीक संबध ठेवणे इत्यादी गोष्टीमध्ये त्यांना आवड असते.

**वास्तव्य :-** सर्वसाधारण व्यक्तींच्या तुलनेत तृतीयपंथी हे एकाच ठिकाणी वास्तव्य करण्याचे टाळतात, ते नेहमी स्थलांतरीत असतात. तसेच समाजाकडून होणारी हेटाळणी पाहता, बरेचदा ते त्यांच्या मठ किंवा गुरूकडे वास्तव्यास असतात. तृतीयपंथीय लोकांचे समाजातील राहण्याचे ठिकाण कोणते हे माहिती करून घेण्यासाठी या अभ्यासाअंतर्गत एकूण ५० उत्तरदात्यांना प्रश्न विचारले. यापैकी स्वतःचे मालकीचे किवा हक्काचे घरात राहणारे उत्तरदाते १ म्हणजे २% आहे, तर इतर ठिकाणी राहतो असे म्हणणारे ४९ उत्तरदाते म्हणजे ९८% आहे, म्हणजेच ९८% उत्तरदाते भाडयाचे घरी किवा गावाबाहेर तांडा व समुदायात राहतात, त्यांचे स्वतःचे मालकी हक्काचे घर नाही. त्यामुळे त्यांच्यात प्रेम, जिव्हाळा, आपुलकीची भावना अर्धवट राहून जाते आणि त्यांचे व्यक्तीमत्व विकास खुंटतो व नुनगंड वृत्तीमध्ये वाढ होतो. तृतीयपंथीसाठी आधारगृह, वृद्धाश्रमासारखे पूरक पर्यायी व्यवस्था असणे गरजेचे आहे. त्यामुळे त्यांची हेडसांड आणि त्या जे सध्या गलीच्छ वस्त्या करून राहतात त्यातून त्यांची मुक्तता होण्यास मदत होईल.

**पालकांची कुचंबना :-** एखादी व्यक्ती जर तृतीयपंथी असेल तर त्याचा परिणाम त्या एकट्या व्यक्तीवर न होता त्याच्या घरातील इतर सदस्यावरही होत असतो. कारण समाजातील लोक त्या कुटुंबातील सदस्यांनाही तशाच घृणास्पद नजरेने पाहतात. कधी कधी याचा विपरीत परिणाम कुटुंबातील एखादया सदस्यावर होतो व तो या तिरस्काराला सहन करू शकत नाही व आत्महत्या करण्याबाबत विचार करतो. या अध्ययना अंतर्गत समाविष्ठ केलेले एकूण ५० उत्तरदात्यांच्या सर्वच कुटुंबात तृतीयपंथी सदस्य असल्यामुळे पालकांची मानसिक कुचंबना झाली. पण त्याच्या कुटुंबातील सदस्यांनी आत्महत्या केलेली नाही असे एकूण सर्वच उत्तरदात्यांचे म्हणणे होते.

**घर सोडणे :-** तृतीयपंथीयांना कुटुंबातील सदस्यांकडून समाजाच्या भीतीने योग्य वागणूक दिल्या जात नाही व समाजाकडून सतत हेटाळणी व तिरस्कार होत असल्यामुळे त्यांना वेगवेगळ्या कारणासाठी घर सोडणे हाच पर्याय असतो. त्यांच्या बाळपणापासून शारीरिक हावभाव व वागणूक यातील फरकामुळे मुलांच्या मनावर विपरीत परिणाम होईल याचा विचार न करता, कुटुंबातील सदस्य अजान बालकावर प्रतिबंध लादतात व या कुटुंबाच्या त्रासाने घर सोडले असे म्हणणारे ३ उत्तरदाते म्हणजे ६% आहे, तर जवळपासच्या नातेवाईकाकडून लैंगिक अथवा आर्थिक फसवणूक झाल्यामुळे घर सोडणारे १३ उत्तरदाते म्हणजे २६% आहे. सामाजिक वातावरणाशी समायोजन करू न शकल्याने स्वतः घर सोडणारे उत्तरदाते २० म्हणजे ४०% आहे. तर इतर कारणाने घर सोडणारे उत्तरदाते १४ म्हणजे २८% आहेत.

**कुटुंबात स्वीकार :-** तृतीयपंथीयांची बाळपणापासूनच देहबोली, स्त्रीयाप्रमाणे शारीरिक लचक, हावभाव, आवाज व वागणूक यातील वेगळेपणा कुटुंबातील सदस्यांना सतत जाणवतो व ते अजान बालकांना समजून घेत नाही त्यामुळे बालकांची कुचंबना होते. अशा बालकांना कुटुंब/समाज स्वीकारायला तयार असतात काय या अनुषंगाने सर्व उत्तरदात्यांना प्रश्न विचारण्यात आले. या अभ्यासानुसार फक्त २ म्हणजे ४% उत्तरदाते कुटुंबात स्वीकारले जातात असे म्हणणारे आढळले. परंतु जास्तीत जास्त ४८ उत्तरदाते म्हणजे ९६% तृतीयपंथीयांना त्यांचे स्वतःचे कुटुंब स्वीकारत नाही असे दिसून येते. आधुनिक युगात समाज भौतिक परिवर्तनाचा स्वीकार जलद गतीने करत आहे. परंतु अजूनही अभौतिक संस्कृतीमध्ये तृतीयपंथीयांसाठी समाजाचा दृष्टीकोन दुषितच आहे. वरील विश्लेषणावरून असा निष्कर्ष निघतो की, प्राचीन काळापासून चालत आलेले विचार, परंपरा व सामाजिक दृष्टीकोन तृतीयपंथीयांसाठी जसेच्या तसेच आहेत. समाजात जनजागृतीची नितांत गरज दिसून येते.

**मुख्य प्रवाहातून दूर असणे :-** तृतीयपंथीयांना स्वतःमध्ये बदल करण्याची इच्छा कमी आहे व प्रजोत्पादन होऊ न शकल्याने, त्यांच्या दृष्टीकोनातून कोणासाठी जगावे असा त्यांना प्रश्न पडतो व जीवनाबद्दल विशेष अपेक्षा नसल्यामुळे त्यांच्यात उदासीनता दिसून येते. समाजाच्या विकृत व भेदात्मक दृष्टीकोनामुळे समाजात मिसळण्याची त्यांची इच्छा नसते आणि त्यामुळे ते मुख्य प्रवाहापासून दूरच आहे. राष्ट्रीय स्थानिक स्तरावर कोणतीही कल्याणकारी योजना नसल्यामुळे त्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नाही. या अनुषंगाने २३ म्हणजे ४६% उत्तरदात्यांनी समाजाच्या विकृत व भेदात्मक दृष्टिकोनामुळे जनप्रवाहातून बाहेर फेकल्या गेल्याचे कबुल केले. तसेच १८ म्हणजे ३६% उत्तरदाते योग्य मार्गदर्शनाच्या अभावामुळे समाजाच्या जनप्रवाहातून बाहेर केल्या गेले असे म्हणाले. तसेच ९ म्हणजे १८% उत्तरदाते स्वतःच्या उदासीनतेमुळे जनप्रवाहातून बाहेर केल्या गेले असे आढळून आले.

**हार्मोन्सची माहिती :-** शालेय स्तरावर लैंगिक शिक्षणाच्या माध्यमातून तृतीयपंथीय/हिजडे-बाळांचा जन्म होण्यास कारणीभूत असणाऱ्या संप्रेरक (हार्मोन्स) प्रक्रियांचे शास्त्रीय ज्ञान दिल्यास तृतीयपंथीयांना समाजातील सर्व घटकांचा सकारात्मक सहयोग व चांगली वागणूक मिळेल की नाही याबाबत सर्व उत्तरदात्यांना प्रश्न विचारण्यात आला. ५० पैकी ४० उत्तरदात्यांच्या मते हार्मोन्स प्रक्रियांचे शास्त्रीय ज्ञान शालेय स्तरावर दिल्यास चांगलाच फायदा होईल. तर ४ उत्तरदात्यांच्या मते गैरसमज शालेय स्तरातून थांबविणे व समायोजन केल्याने फायदा होईल तसेच ६ उत्तरदात्यांच्या मते या शिक्षणाने काही फरक पडणार नाही असे आढळले.

**जन्मतः तृतीयपंथीय नोंदी :-** जन्मतः अर्भकाच्या शरीरात काही लैंगिक कमतरता असल्यास चिकित्सा करतांनी डॉक्टरांच्या निदर्शनात येते तर कधीकधी संप्रेरकाचे बदलामुळे प्रौगंडा अवस्थामध्ये बाळाच्या वर्तणुकीत बदल दिसून येतो. यामुळे नवजात बालकाचे लिंग जन्माचे वेळेस ज्ञात झाल्याबरोबर विहित फॉर्ममध्ये नोंद करणे योग्य होईल का असा प्रश्न सर्व उत्तरदात्यांना विचारण्यात आला. या अभ्यासानुसार असा निष्कर्ष निघतो की एकूण ४४ म्हणजे ८८% तृतीयपंथीयांचे मते अशा भिन्न लिंगाची नोंद विहित फॉर्ममध्ये तृतीयपंथी अशी करण्यात यावी. जन्मतः अर्भकाची नोंद विहित नमुन्यात केल्यास योग्य उपचार व योजना करता येईल. तर ६ म्हणजे १२% उत्तरदात्यांच्या मते लिंगाची नोंद विहित फॉर्ममध्ये नोंद करण्यात येऊ नये असे आढळले.

४४ उत्तरदात्यांनी स्त्री, पुरुष शिवाय भिन्न लिंगाची नोंद विहित फॉर्ममध्ये तृतीयपंथी अशी करण्यात यावी असे मत व्यक्त केल्यामुळे पुढे या नोंदीचा कोणकोणत्या बाबीवर परिणाम होऊ शकतो याचा अभ्यास करण्यात आला. या ४४ उत्तरदात्यांपैकी २५ म्हणजे ५६.६% तृतीयपंथीयांच्या मते नोंदीचा उपयोग बाळाचे संगोपनासाठी होईल तसेच या नोंदीमुळे मनोचीकीत्सकाकडून पालकांचे

चांगले समुपदेशन होईल व कुटुंबास योग्य तो सल्ला दिल्यामुळे बालकाचा सर्वांगिण विकास होऊ शकतो. तर ४४ उत्तरदात्यांपैकी ११ म्हणजे २५% तृतीयपंथीयांच्या मते त्या नोंदी पालकांची व्दिधा मनस्थितीतून मुक्तता होण्यासाठी उपयोगी होईल. तसेच ५ म्हणजे ११.७% तृतीयपंथीयांच्या मते त्या नोंदीमुळे प्रौगंडा अवस्थामध्ये बाळाच्या होणाऱ्या शारीरिक बदलाविषयी योग्य मार्गदर्शन वेळेवर करता येईल.

**समारंभात निमंत्रणाबाबत**:- तृतीयपंथीयांना समाजात वेगवेगळ्या धार्मिक, लग्न, बारसे व इतर कार्यप्रसंगामध्ये अनन्य साधारण महत्व आहे व त्यांची या कार्यक्रमात उपस्थिती शुभ मानतात म्हणून त्यांना मोठया प्रमाणात आमंत्रित करतात. ५० उत्तरदात्यांपैकी ३५ म्हणजे ७०% तृतीयपंथीयांना वर उल्लेखित कार्यप्रसंगामध्ये आमंत्रण असते असे आढळून आले. पुढे या ३५ उत्तरदात्यांना कोणकोणत्या कार्यप्रसंगामध्ये आमंत्रित करण्यात येते या बाबत माहिती घेण्याचे प्रयत्न केले असता असे आढळून आले की ३५ पैकी १५ म्हणजे ४२.८५% उत्तरदात्यांनी गणपती उत्सवात निमंत्रण मिळते असे सांगितले. तर १३ म्हणजे ३७.१४% उत्तरदात्यांनी देवीच्या नवरात्र उत्सवात समाजातील लोक निमंत्रण देतात असे म्हणाले. तसेच उर्वरित ७ उत्तरदात्यांना मुलांचे बारसे, लग्न समारंभ व काही राजकारणी लोक आमंत्रण देतात असे आढळून आले. याला कारण असे की भारतीय समाज व्यवस्थेत वरील कार्यप्रसंगामध्ये तृतीयपंथीयांचे आशीर्वाद सर्व श्रेष्ठ समजले जातात. तसेच या सर्व कार्यप्रसंगी तृतीयपंथीय नृत्य व कला सादर करून लोकांचे मनोरंजन करतात.

**आशीर्वादाचे/ दुवाचे परिणाम:-** समाजामध्ये साधारणपणे लग्न, जन्म व इतर शुभ प्रसंगी तृतीयपंथीयांचा आशीर्वाद, दुवा याला विशेष महत्व आहे व अशा प्रसंगी त्यांची उपस्थिती शुभ मानतात. तसेच एखादा आजार किंवा मानसिक त्रासाचे निवारण करण्यासाठी तृतीयपंथीयांचा आशीर्वाद, दुवा याला समाजात मान्यता कशी आहे याविषयी उत्तरदात्यांना प्रश्न विचारण्यात आले. यासाठी ५० पैकी ४९ (म्हणजे ९८%) उत्तरदाते तृतीयपंथीयांचा आशीर्वाद, दुवा याला समाजात चांगलीच मान्यता आहे असे मानणारे आढळले तर उर्वरित १ उत्तरदाता याबाबत अनभिज्ञ आढळला.

**सामाजिक संस्थांची माहिती:-** हिजड्यांना एकत्र आणुन त्यांच्या उत्थानासाठी अनेक संस्था कार्यरत आहेत. जसे की नाझ फाउंडेशन, संगमा, सहायिका, समपथिक, हमसफर, ल्याबीया, स्त्रीसंगत सारख्या अनेक संस्था समाजाच्या उत्थानासाठी सेवा देतात, यासारखी माहिती उत्तरदात्यांना आहे की नाही हे सुध्दा या अभ्यासात शोधण्याचा प्रयत्न केला. एकूण सर्व उत्तरदात्यांपैकी ४३ म्हणजे ८६% तृतीयपंथीयांना, सामाजिक समस्यांच्या उच्चाटनासाठी कार्यरत सामाजिक संस्थांची माहिती आहे असे आढळले. या सामाजिक संस्थांचे उद्देश तृतीयपंथीयांचे सक्षमिकरण करणे हे होय. या सामाजिक संस्थांची वर्गवारी स्थानिक स्तर, राष्ट्रीय स्तर व आंतरराष्ट्रीय स्तर अशाप्रकारे करतात. व यातील स्थानिक सामाजिक संस्था तृतीयपंथीयांचा विकास करून त्यांना चांगले जीवन जगण्यासाठी प्रेरीत करण्याचे काम करतात याबद्दल त्यांना माहित आहे असे आढळून आले व त्या स्थानिक संस्थांचा उपयोग व मार्गदर्शन तृतीयपंथीय नेहमी घेतात.

**जात पंचायत:-** तृतीयपंथीय समुदायाचे स्वातंत्र्य, वेगळे अस्तित्व व वेगळी संस्कृती व्यवस्था आहे. वर्षातून १-२ वेळा त्यांची जात–पंचायत भरते, त्यात गुरु, मौसी, नायक म्हणून असणारे वरिष्ठ, पंचायतीचे निर्णय घेतात, आम्हीच राजा आणि आम्हीच प्रजा असे ते मानतात. मुर्तीजापूर येथील त्यांच्या मेळाव्यात शोध संबंधीत चर्चा करण्यासाठी संशोधक गेले असता वरील सर्व खरे असल्याचे लक्षात आले म्हणून जात–पंचायत चे नियम कसे पाळतात व नियम न पाळल्यास काय होते याची माहिती घेण्यासाठी संबंधीत प्रश्न उत्तरदात्यांना विचारण्यात आला.

या अभ्यासानुसार एकूण ५० उत्तरदात्यांपैकी ४४ म्हणजे ८८% तृतीयपंथीयांनी जात-पंचायतीचे नियम न पाळल्यास दंड भरावा लागतो असे सांगितले. व उर्वरित ६ उत्तरदात्यांकडून, समुदायातून बहिष्कृत करने, शारीरिक छळ करणे, मानसिक अपमान करणे अशा प्रकाराबद्दल माहिती मिळाली. त्यांचे रूढी परंपरेनुसार हुक्कापानी बंद करणे, इतर समारंभामध्ये त्यांना सम्मेलीत न करणे, पैश्याच्या स्वरुपात दंड भरणे इत्यादी निर्णय त्यांचे बुजुर्ग तृतीयपंथीय पंच म्हणून न्यायनिवाळा करतात.

**व्यवसाय:-** तृतीयपंथीयांची जीवनशैली वेगळी असल्याने ते उदरनिर्वाहासाठी कोणते व्यवसाय करतात हे माहित करून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. या अभ्यासाअंतर्गत एकूण ५० उत्तरदात्यांपैकी ३० (६०%) तृतीयपंथी भिक्षा (मंगती) मागतात, तर १६ (३२%) तृतीयपंथी शरीरविक्रय (वेश्याव्यवसाय) करतात व उर्वरित ४ म्हणजे ८% तृतीयपंथी नृत्य गायन करून उदरनिर्वाह करतात असे आढळून आले. त्याच्यात शैक्षणिक पात्रता व कौश्यल्य नसल्यामुळे त्यांना समाजात कोणीही रोजगार उपलब्द करून देत नाही म्हणून उदरनिर्वाहासाठी व मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांना रेल्वेत, स्टेशनवर, बाजारात, दुकानासमोर नृत्य, गायन, भिक्षा व इतर कामे करावी लागतात.

**इतर व्यवसायाबद्दल आवड:-** तृतीयपंथीयांना व्यावसायीक शिक्षण घेवून कोणता व्यवसाय करायला आवडेल हे जाणून घेण्यासाठी संबंधीत प्रश्न उत्तरदात्यांना विचारण्यात आला. ५० पैकी २० म्हणजे ४०% उत्तरदाते गृहोद्योग करणे, ४ उत्तरदाते बुटी पार्लरमध्ये, २ उत्तरदाते शिवणकाम तर ४ उत्तरदाते यांनी परंपरागत व्यवसायामध्ये काम करण्याची रुची दाखवली. तृतीयपंथीय समुदाय एकत्र येऊन पापड, लोणचे, हॉटेलमध्ये पोळ्या पुरविणे, मसाले तयार करणे, कंपनीमध्ये डब्बे पुरविणे, आचारी इत्यादी कामे करणे त्यांना आवडेल असे दिसून आले.

**शिक्षण व्यवस्था:** समाजाकडून हेटाळणी, सतत अपमानास्पद वागणूक, छळ, शोषण या बाबीमुळे तृतीयपंथीयांना शिक्षण घेणे अशक्य होते. तसेच शिक्षण व्यवस्थेमध्ये तृतीयपंथीयांसाठी विशेष वेगळा शैक्षणिक अभ्यासक्रम जसे की लैंगिक शिक्षण देण्यात आला तर त्याचा त्यांना खूप फायदा होईल असे वाटते. लैंगिक शिक्षण तृतीयपंथीयांसाठी अत्यंत आवश्यक आहे व लैंगिक शिक्षणाच्या अभावामुळे त्यांना अनेक आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागते. या अनुषंगाने तृतीयपंथीयांसाठी शिक्षणात विशेष वेगळा शैक्षणिक अभ्यासक्रम ज्या मध्ये लैंगिक शिक्षण आहे असा उपलब्ध असावा की नाही या दृष्टीकोनातून सर्व उत्तरदात्यांना प्रश्न विचारण्यात आले . या अभ्यासासाठी निवडलेल्या सर्व ५० ही उत्तरदात्यांनी तृतीयपंथीयांसाठी शिक्षणात विशेष वेगळा शैक्षणिक अभ्यासक्रम ज्या मध्ये लैंगिक शिक्षण आहे अशी व्यवस्था असावी याबाबत सहमती दर्शवली.

**शिक्षण घेणे:-** समाजाच्या मुख्य प्रवाहातून वाळीत टाकलेल्या वंचित व शोषित अशा तृतीयपंथीयांना कायदेशीर मान्यता देऊन समाजात पुनर्वसन करणे हि काळाची गरज आहे व आज ते काही प्रमाणात शिक्षण घेतांना दिसून येतात. म्हणून उत्तरदात्यांना शिक्षण घेतले आहे काय हा प्रश्न विचारण्यात आला. या अभ्यासात एकूण ५० उत्तरदात्यांपैकी ४९ (९८%) तृतीयपंथीय शिक्षण घेतले असे कबुल करतात. तर फक्त १ उत्तरदाता याबाबत अनभिज्ञ आढळून आला.

**शिक्षण घेतांनाच्या अडचणी:-** समाजाकडून अपमानास्पद वागणूक, छळ व शोषण यामुळे तृतीयपंथीयांना शिक्षण घेणे फार कठीण होते. ते समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असतात व त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार व प्रचार कमी असतो त्यामुळेही त्यांना शिक्षण घेतांनी अडचणी येतात. म्हणून उत्तरदात्यांना शिक्षण घेतांनी काय अडचणी येतात हा प्रश्न विचारण्यात आला. या अभ्यासात एकूण ५० उत्तरदात्यांपैकी ३३ (६६%) तृतीयपंथी शिक्षण घेतांनी समाजाकडून त्रासामुळे अडचणी येतात असे कबुल करतात. तर १६ उत्तरदाते असुरक्षिततेमुळे शिक्षणात अडचणी येतात असे म्हणाले. व १ उत्तरदात्याच्या मते शिक्षण घेतांनी समाजाकडून त्रास व असुरक्षिततेमुळे अडचणी येतात.

**मार्गदर्शन व सहाय्यक कक्ष:-** तृतीयपंथीयांना समाज स्वार्थपूर्ण वागणूक देतात त्यामुळे ते समुदायाने राहतात. त्यांचे वेगळे अस्तित्व, स्वातंत्र्य व वेगळी संस्कृती व्यवस्था आहे. त्यांना एकत्र आणुन त्यांच्या उत्थानासाठी अनेक संस्था कार्यरत आहेत. त्यामुळे तृतीयपंथीय समाजाच्या मुख्य प्रवाहापासून वेगळे असल्याने त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मार्गदर्शक व सहाय्यक कक्ष असावे जेणेकरून त्यांच्या मनात समाजाबद्दल असलेले गैरसमज दूर होण्यास मदत होईल. याबाबतीत ५० ही उत्तरदात्यांना संबंधीत प्रश्न विचारण्यात आले असता सर्व ५० ही (म्हणजे १००%) उत्तरदात्यांनी तृतीयपंथीयांसाठी मार्गदर्शक व सहाय्यक कक्ष असावे असे मत व्यक्त केले. या मदत कक्षामुळे तृतीयपंथीयांना स्वतःचा विकास करण्याची संधी मिळेल.

**आरोग्य विषयक माहिती:-** तृतीयपंथीयांकडे डॉक्टर व तेथील कर्मचारी यांचा पाहण्याचा दृष्टीकोन चांगला नसतो. डॉक्टर व दवाखान्यातील कर्मचारी यांचा तृतीयपंथीयांना उपचार करण्याचा दृष्टीकोन समानतेने व माणुसकीने करण्यासाठी त्यांना संवेदनक्षम करणे, कर्मच्यार्यांना HIV/AIDS संबंधी प्रशिक्षण, लिंगबदल यासाठी दवाखान्यात मोफत मार्गदर्शन असणे यासाठी शासनाने आरोग्य संस्थांना सुचित करणे, तसेच तृतीयपंथीयांना उपचार व शस्त्रक्रिया यासाठी आरोग्य विमा योजना अमलात आणने आवश्यक आहे. म्हणून तृतीयपंथीयांच्या आरोग्य विषयीच्या समस्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला. अध्ययनासाठी निवडलेल्या एकूण ५० पैकी ४५ (म्हणजे ९०%) उत्तरदात्यांनी त्यांना आरोग्याच्या समस्या येतात असे सांगितले. अनैसर्गिक संबंध, अमलीपदार्थ सेवन यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतात व या समस्या सोडविण्यासाठी सर्व ५० हि उत्तरदाते प्रयत्न करतात असे आढळून आले.

**डॉक्टरांकडे एकटे/सोबत जाणे:-** तृतीयपंथीय हा जरी समाजातील उपेक्षित घटक असला तरी आजच्या आधुनिक काळात त्यांचा संबंध समाजातील इतर लोकांशी येतोच तसेच आरोग्य विषयीच्या समस्यावर उपचारासाठी डॉक्टरांकडे जावेच लागते. म्हणून डॉक्टरांकडे जातांनी तृतीयपंथीय एकटे जातात की सोबत गुरु/ मित्र /नातेवाईक यांना घेवून जातात हे जाणून घेण्यासाठी उत्तरदात्यांना प्रश्न

विचारण्यात आले. यावेळी ५० पैकी ४३ (म्हणजे ८६%) उत्तरदाते आरोग्याच्या उपचारासाठी मित्र मंडळीना डॉक्टरांकडे सोबत नेतात असे आढळून आले. तर ४ उत्तरदाते गुरुंना व २ उत्तरदाते नातेवाईकांना डॉक्टरांकडे सोबत नेतात व १ उत्तरदाता डॉक्टरांकडे एकटाच जातो असे समजले.

**निष्कर्ष:-** या संशोधनासाठी उपकल्पनाच्या, गृहीतकृत्याच्या व निवडलेल्या उत्तरदात्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारावर खालीलप्रमाणे निष्कर्ष मांडलेले आहेत.

1) ते गुजरातेतील बोचरा देवी, अजमेर येथील दरगाह शरीफला मानतात व सर्व धर्मातील सन साजरे करतात.
2) त्यांची मातृभाषा सर्वाधिक मराठी आहे, काही प्रमाणात ते हिंदी भाषेतही बोलण्याचा प्रयत्न करतात.
3) त्यांचा राहणीमानाचा दर्जा साधारण आहे.
4) जास्तीतजास्त उत्तरदाते स्वतःचे हक्काचे घर सोडून इतरत्र राहणारे आढळले.
5) त्यांना त्यांचे कुटुंब स्वीकार करीत नाही म्हणून त्यांना समाजात वावरतांना खूप अडचणी येतात.
6) त्यांना समाजाकडून फक्त लग्न, जन्म व इतर समारंभामध्ये निमंत्रण मिळते.
7) शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याने त्यांना स्वयंसेवी संस्थांच्या परोपकारी कामाविषयी रुची कमी आहे.
8) त्यांना त्यांच्या जातपंचायतीचे नियम व निर्णय पाळणे बंधनकारक आहे.

समुदायातील गुरु-चेले परंपरा, निर्वाण(लिंग छेदन) दुध का आचल(म्हणजे मातुत्वाची भावना) या सर्व विधी त्यांच्यात आहेत. प्रजोत्पादन करु न शकल्याने दुध का आचल या विधीच्या माध्यमातून आई-मुलगी, भाऊ-बहीन वगैरे असे नातेसंबंध ते जोडतात आणि कौटुंबिक जीवन जगत असतात. त्यांना त्यांच्या परीवाराकडून आधार मिळत नाही म्हणून ते घरातून पलायन करतात त्यामुळे त्यांना लैंगिक शोषण, रस्त्यावर राहणे, व्यसनाधीनता इत्यादी समस्यांना तोंड द्यावे लागते.

**सुचना व शिफारसी:-**

१) तृतीयपंथीयांसाठी स्वतंत्र व विशेष शिक्षणाची व्यवस्था असावी.
२) त्यांना माणूस म्हणून कायद्याने जगण्याचा समान अधिकार असावा.
३) त्यांच्यासाठी शासनाने योग्य उपाययोजना कराव्या.
४) त्यांचे सर्वेक्षण व जनगणना तृतीयपंथी म्हणून करण्यात यावी.
५) सर्व स्तरावर मार्गदर्शन/सहाय्यक व समुपदेशन केंद्र असावे.
६) घरकुल योजना व इतर ओळखपत्र त्यांना द्यावे.

**References:**


1) Sharma S.K.(1984)Eunuchs:Past & Presence, Eastern Anthropologist,4,381-389

2) Carstairs, G.M. (1956) Hinjra & Jiryan: Two derivatives of Hindu attitudes to sexuality, British Journal of Medical Psychology, 29, 128-138

3) Mehta S. (1945), Eunuchs, pavaiyas and hijaras, Gujrat Sahitya Sabha Part 2, 3-75

4) Jaffrey Z. (1997). The Invisibles: A tale of the eunuchs of India, London:Weidenfeld & Nicholson.

5) S. Nanda, (1990), Neither man nor Woman: The Hijras of India., California Wadsworth Publishing co.

6) Cohen L., (1995), In P.R. Abramson & S.D.Pinkerton (Eds.) Sexual Nature, sexual culture (p.276-304) Chicago & London: University of Chocago Press.

7) J. N. Zhou, M.A. Hofman, I. J. Gooren & D. F. Swaab (1997), International Journal of Transgenderism (online)

Available: http://www.symposion.com/ijt/ijte0106.htm

8) Hiltebeitel A. (1980) Siva,the Goddess and the disguises of the Pandavas & Draupadi. History of Religions, 20(1-2)147-174

9) Nanda S.,(1999)The Hijras of India: Neither man nor Woman:2nd Ed. California Wadsworth Publishing co.

10) Sandeep Bakshi, (2004), Journal of Homosexuality, 46(3), p.211-233, https://dx.doi.org/10.1300/J082V46 no3_13

11) Moran L. & Sharp A. (2004), Violence, identity and policing: The case of violence against transgender people. Criminal Justice, 4(4), 395-417

12) Fitzpatric K.K., Euton S J, Jones J N, Schmidt N.J., (2005), Gender role, sexual orientation & suicide risk. Journal of Affective disorders, 87,35-42

13) I. Sen, Human Rights of Minority & Women's, (Transgender Human Rights) Delhi Isha Books 2005,(2) p.4-41

14) Yogyakarta Principles(2008), Online available: http://www. Yogyakartaprinciples.org

15) Seth T Pardo, Journal of Research facts & Findings, New York 2008

16) Preeti Sharma, (2012) International Journal of Research in Economics & Social Sciences,2,12, ISSN:2249-7382

17) Rajia Sultana, (2012) Jan Pravahatil Samlaingikta,ISBN-978-81-905776-31-1, Nabh Prakashan, Amravati.

18) Anitha Chettiar, (2015) International Journal of Social Science & Humanity, 5,9, p.752-759

19) Sibsankar Mal, Asian Journal of Research in Social Sciences & Humanities, 5(4), 2015, p.108-117